
असे गुरू...
असे शिष्य !
मंगला दिघे
परी
प्रकाशन

असे गुरू... असे शिष्य !

© सुरक्षित

**प्रकाशक :**
परी प्रकाशन
निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली,
कोल्हापूर - ४१६ ००१

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती :**
२०१६

**किंमत :**
रुपये १३०/-

## अनुक्रमणिका

१. भृगु आणि भरद्वाज ............ ३
२. महर्षी दध्यङ् आणि अश्विनीकुमार ९
३. रैक्व आणि जानश्रुती ............ १६
४. भार्गव आणि कमलराज ......... २४
५. महर्षी वेद व्यास आणि जनक ..... ३०
६. श्रीकृष्ण आणि युधिष्ठिर ......... ३४
७. यम आणि नचिकेत .............. ३८
८. वृशऋषी आणि त्रैवृष्ण त्र्यरुण .... ४३
९. श्री गणेश आणि देवगण ......... ४७
१०. अश्वपती आणि ऋषीगण ........ ५१
११. महर्षी वशिष्ठ आणि दिलीप ..... ५६
१२. महर्षी वशिष्ठ आणि रघू ......... ६१
१३. धौम्य आणि उपमन्यू ........... ६६
१४. धर्मानंद आणि घाटम ............ ७१
१५. ब्रह्मदेव आणि विश्वामित्र ........ ७६
१६. शंख आणि लिखित ............ ८१
१७. छागवाहन आणि चिरायुस् ....... ८७
१८. महर्षी भृगु आणि निदाघ ........ ९२
१९. लोमश आणि इंद्र ............... ९७
२०. शिवशर्मा आणि सोमशर्मा ....... १०२
२१. सांदीपनी आणि श्रीकृष्ण-सुदामा १०७
२२. द्रोणाचार्य आणि एकलव्य ....... ११४
२३. शुक्राचार्य आणि दैत्यराज बळी ... १२१
२४. वरुण आणि मेघवाहन ........... १२९
२५. धौम्य आणि आरुणी ............ १३४
२६. रामदास आणि शिवाजी ......... १३९
२७. नामदेव आणि परिसा भागवत .... १४४
२८. भगवान बुद्ध आणि सुप्रिया ..... १५०
२९. क्षणदाकर आणि राणा हमीर ..... १५४
३०. श्रीरामकृष्ण परमहंस आणि विवेकानंद १६०
३१. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई १६५
३२. अडकुजी आणि तुकडोजी ....... १७०

# भृगु आणि भरद्वाज

''भूक.... भूक.... प्रचंड भूक लागलीय मला.'' भरद्वाज स्वत:शीच बोलत होता.

भरद्वाजाचा पिता बृहस्पती आणि माता ममता ! या दोघांचाही जीव आपल्या पुत्रावर होता. प्रत्यक्ष पिता हा साऱ्या गुरुंचाही गुरू ठरावा असाच होता. देवलोकातील समस्त देवगणांचा गुरू म्हणजे बृहस्पती ! सारे देव बृहस्पतींना फार मानत. गुरुचरणी लीन होत. हातचं काहीही न राखता गुरू ज्ञान देत असत. साहजिकच देवांचीही त्यांच्या ठायी निष्ठा होती. अध्ययन आणि अध्यापन या क्रिया सतत घडत. ज्ञानयज्ञ नेहमी सुरू असे.

भरद्वाजाची आई बघत होती. आज कित्येक दिवसांपासून एकांतात बसून भरद्वाज हेच बोलत होता. ''भूक लागलीय मला. प्रचंड भूक लागलीय मला.''

''बाळा, भूक लागलीय ना तुला ?'' आताही मातेनं विचारलं.

''होय आई, खूप भूक लागलीय.''

''मग चल तर. संध्यावंदन झालंय ना तुझं ?''

''हो.''

''मी ताट तयार करते. भोजन करून घे.''

''आई, पोट भरलंय माझं.''

''पोट भरलंय ? आणि तरी भूक लागलीय म्हणतोय ? अरे , भूक लागते ती उपाशीपोटी. भरल्या पोटी नाही बाळा.''

''तसं नाही आई...''

''मग कसं ? कसली भूक लागलीय तुला ? मी रांधून वाढते.''

''आई गं...''

''बेटा, आईजवळ कसला आलाय संकोच ? बोल, काय हवंय तुला ? आताशा मी बघतेय, भूक भूक म्हणून बोलत असतोस. तुझी तब्येत तर ठीक आहे ना ? नाहीतर अश्विनीकुमारांकडून आपण उपचार करून घ्यायचे का ?''

''नाही आई, खरं सांगू तुला ?''

''सांग ना.''

''मला भूक लागलीय ती ज्ञानाची ?''

''ज्ञानाची भूक ?''

''होय आई, ज्ञानाची भूक. खूप ज्ञान ग्रहण करावं, विश्वाच्या कानाकोपऱ्यातून, सूर्याच्या किरणांमधून, सरितांच्या प्रवाहातून, वायूच्या झोक्यातून, पाखरांच्या कलरवातून, रानावनातल्या शेताभातातून , उमलणाऱ्या पुष्पातून, ज्या ज्या ठिकाणाहून ज्ञान मिळेल ते ग्रहण करावं असं अगदी आतून वाटतंय. आई, साऱ्या चराचरात तो एकच दैदिप्यमान ईश्वर भरलाय. त्याच ईश्वराला ओळखावं, त्याच्याशी एकरूप व्हावं. आई गं, ज्ञानी व्हावं ते विश्वात आपली ख्याती पसरावी म्हणून नव्हे...''

''मग ?''

''त्या ज्ञानाचा उपयोग विश्वकल्याणासाठी व्हावा. सर्व जग सुखी व्हावं ही माझी इच्छा आहे.''

''मग, तुझे पिता एवढे देवांचे गुरू आहेत. त्यांच्याजवळ तर केवढं ज्ञान आहे !''

''आई, पिता मला वंदनीय आहेत; पण ते आहेत देवांचे गुरू. देवगुरुंजवळ शिकावं असं नाही मला वाटत.''

''मग काय वाटतं बाळा ?''

''दुसऱ्याच कोणाजवळून तरी ज्ञान ग्रहण करावं. आई गं, ही ज्ञानग्रहणाची माझी तळमळ तू पिताजींना सांग ना. ते माझी ही मनीषा पूर्ण करणार नाहीत ?''

''नक्कीच करतील. पुत्रासाठी ते ही गोष्ट करणार नाही का? तुला अशी शंका का आली ?''

''नाही आई, गैरसमज करून घेऊ नकोस. त्यांच्यावर माझा पूर्ण भरवसा आहे; पण ते त्यांच्या कामात इतके गढलेले असतात की माझ्यासाठी शिक्षणाची सोय करणं त्यांना कितपत जमेल !''

''तू चिंता करू नकोस. मी तुझ्या पिताजींच्या कानावर घालते.''

चंद्राचं शीतल चांदणं पसरलेलं होतं. पारिजातकाचा मंद सुगंध पसरलेला होता. सारं वातावरण कसं मनाला प्रसन्नता आणणारं होतं.

''स्वामी...''

''कोण ? ममता...''

''होय, मीच.''

''आज काही विशेष काम ?''

''स्वामी, आपला पुत्र भरद्वाज याला ज्ञानाची भूक लागलीय.''

''ही तर अत्यंत सुखकारक गोष्ट आहे. केव्हापासून त्याच्या शिक्षणाची तयारी करायला लागायचं ?''

''स्वामी, त्याला आपल्या पित्याकडून ज्ञानग्रहणाची इच्छा नाही.''

''मग ?''

''त्याची इच्छा आहे की त्याचं शिक्षण इतर कोणाकडून तरी व्हावं.''

''मग त्यात काहीच कठीण नाही; पण त्याला एकाच गुरुकडून सगळं ज्ञान मिळणार नाही. ज्याच्याजवळून जे काही ग्रहण करण्यासारखं असेल ते त्याला घ्यावं लागेल.''

इतका वेळ माय–पिताजींचं बोलणं ऐकत असलेला भरद्वाज पुढे आला. दोघांनाही वंदन करून तो म्हणाला, ''पिताजी, ज्ञान मिळवण्याची तीव्र लालसा मला स्वस्थ बसू देत नाही. आपण लवकरात लवकर माझ्या अध्ययनाची व्यवस्था करावी ही आपल्याला नम्र विनंती आहे.''

आपल्या पुत्राचे बोल ऐकून बृहस्पती प्रसन्न झाले. ते म्हणाले, ''बाळा, तुझी ही ज्ञानग्रहणाची तीव्र इच्छा पाहून मला अत्यंत आनंद झालाय. मी उद्याच देवराज इंद्राकडे जातो.''

दुसरे दिवशी बृहस्पती इंद्राकडे आले.

''यावं गुरुवर्य, आपलं स्वागत असो !'' इंद्रानं बृहस्पतींना उच्चासनावर बसवलं.

''आज्ञा व्हावी गुरुदेव, आपली काय सेवा करू ?''

''देवराज, आज मी तुझ्याकडे एक याचक म्हणून आलोय.''

''गुरुदेवांनी फक्तआज्ञा करावी.''


''इंद्रा, माझा पुत्र भरद्वाज आता मोठा झालाय. त्याच्या गुरुच्या शोधात मी निघालोय.''

''प्रत्यक्ष बृहस्पती एवढे ज्ञानी असताना त्यांच्या पुत्राला अन्य गुरुंची काय आवश्यकता ?''

''पिता हा गुरू होत नाही असं नाही इंद्रा; परंतु माझ्या पुत्राला इतरांकडून ज्ञान घेण्याची इच्छा आहे. आणि देवराज, त्याला काही काळ मी तुझ्याकडे ठेवू इच्छितो.''

''माझ्याकडे ?''

''हो, तुझ्याकडे तो व्याकरणशास्त्र शिकेल.''



''आज्ञा शिरसावंद्य गुरुवर्य.''

भरद्वाज आता इंद्राचा शिष्य झाला. तो तल्लख बुद्धीचा होता. विद्याग्रहण करण्याची त्याची प्रबळ इच्छा होतीच. भरद्वाजानं इंद्राजवळून व्याकरण शास्त्राचं अध्ययन केलं. पुढे व्याख्यांसहित अनेक ऋषींना त्यानं ते शिकवलं.

''इंद्रदेवा, आपण मला व्याकरणशास्त्र शिकवलंत...''

''वत्सा, तू त्यात पारंगतही झालास. आता तुला मी आयुर्वेद शिकवणार आहे.''

''यात शिकण्यासारखं काय आहे ते कृपया सांगावं.''

''आयुर्वेदात तुला प्रामुख्यानं शिकायला मिळेल ते औषधी शास्त्र. प्रत्येक वस्तूचा गुणधर्म काय, ती घेण्याची मात्रा काय हे सारं तुला शिकता येईल.''

भरद्वाजानं इंद्राकडून आयुर्वेदाचं ज्ञान प्राप्त करून घेतलं. आयुर्वेदाच्या गहन अध्ययनाच्या आधारावर त्यानं पुढे आयुर्वेद संहितेची रचना केली.

व्याकरण शास्त्र आणि आयुर्वेदाचं ज्ञान प्राप्त झाल्यानंतर भरद्वाज पित्याला म्हणाला, ''पिताजी, मला पुढे शिकायचं आहे.''

''बाळा, मी तुला आता अशा एका गुरुंकडे पाठवणार आहे, जे तुला धर्मशास्त्र शिकवतील.''

भरद्वाज उत्साहित झाला. एकेका गोष्टीचं ज्ञान मिळवण्यात त्याला ब्रह्मानंद मिळत होता.

''सांगा पिताजी, आपण मला कोणाकडे पाठवणार आहात?''

''महर्षी भृगु.''

आणि भरद्वाज महर्षी भृगुंचा शिष्य झाला. भरद्वाजानं संपूर्ण वेदांचं अध्ययन करण्याचा प्रयत्न केला. भृगुंनी त्याला केवळ धर्मशास्त्रच शिकवलं नाही; तर अर्थशास्त्र, धनुर्वेद, भौतिक विज्ञानशास्त्र आणि विमानशास्त्रही शिकवलं.

आपला शिष्य कितपत विद्यापारंगत झालाय हे बघण्याची आता भृगुंना उत्कंठा लागली. एकदा ते इंद्राच्या अमरावतीला पोहोचले. इंद्रानं त्यांचं यथोचित स्वागत केलं.

''इंद्रा...''

''बोला महर्षी.''

''भरद्वाज तुझ्याजवळून व्याकरण शास्त्र आणि आयुर्वेद शिकला, खरं ना ?''

''पण महर्षी, आपणच त्याचे खरे गुरू आहात. आपणाकडून त्यानं केवढं ज्ञान ग्रहण केलंय !''

''आता त्याच्या परीक्षेची वेळ आलीय, आणि देवराज, हे कार्य मी तुझ्यावर सोपवतोय.''

''म्हणजे, भरद्वाजाची परीक्षा मी घ्यायची ?''

''होय तू.''

महर्षींचं म्हणणं इंद्रानं मान्य केलं. काही अंशी भरद्वाज त्याचाही शिष्य होताच.

इकडे भरद्वाज सर्व शास्त्र पारंगत झाला होता. आता त्याची एकच इच्छा राहिली होती, आणि ती म्हणजे अमृत–तत्त्व प्राप्त करण्याची. स्वर्गामधील इंद्रदेवाकडे असलेलं अमृत ! भरद्वाजाला तळमळ

होती ती जनकल्याणाची. स्वहिताबरोबर परहित कसं जपता येईल याची त्याला सदैव चिंता असे. तो म्हणे, स्वत:पुरतं ज्ञान मिळवण्यात कोणता आलाय लौकिक ! ज्ञान तेच, ज्यामुळे साऱ्यांचंच कल्याण होईल. त्याची ज्ञानाची क्षुधा तृप्त होणारी नव्हती. ज्ञान, अधिक ज्ञान, अधिकतम ज्ञान हे तर त्याचं जीवनउद्दिष्ट होतं. त्याच्या तपस्येनं भृगु प्रसन्न होते.

इंद्रानं भृगु मुनींचा वेश धारण केला. नित्याप्रमाणे भरद्वाज गुरुंकडे गेला.

''वत्सा, तुझ्यावर मी प्रसन्न झालोय. तेव्हा आता तुला जो वर मागायचा असेल तो माग.'' भृगुवेशधारी इंद्र म्हणाला.

''गुरुवर्य, आपण माझ्यावर प्रसन्न झालात. परमभाग्य माझं ! आपण मला एकच वर द्यावा...''

''माग.''

''मला शंभर वर्षांचं आयुष्य द्यावं.''


''तथास्तु !''

कशासाठी हवं होतं भरद्वाजाला शंभर वर्षांचं आयुष्य ? तो भोगी नव्हता, त्यागी होता. मिळालेल्या वरानं तो प्रसन्नचित्त झाला, आणि त्यानं पुन्हा अध्ययनाला सुरुवात केली. त्याला अमृत-तत्त्व प्राप्त करायचं होतं. सोन्यासारख्या आयुष्याचा सदुपयोग करायचा होता.

शंभर वर्षे पूर्ण झाली, इंद्र प्रकट झाला.

''वत्सा, शंभर वर्षे पूर्ण झाली. मी तुझ्यावर प्रसन्न आहे. वर माग.''

''गुरुवर्य, आणखी शंभर वर्षांचं आयुष्य हवंय मला.''



''तथास्तु !''

पुन्हा भरद्वाज अध्ययनात मग्न ! स्वशरीराकडे बघायला वेळ कुठे होता त्याला ! पुन्हा अध्ययन, अध्ययन आणि अध्ययन ! एकच ध्यास. अमृत-तत्त्व प्राप्त करणं.

शंभर वर्षे पूर्ण झाली. पुन्हा इंद्र प्रकट झाला.

''वत्सा, मी अतिशय प्रसन्न आहे. वर माग.''

''गुरुदेव, आणखी शंभर वर्षांचं आयुष्य हवंय मला.'' आणि अशा तऱ्हेनं अध्ययन आणि वरदानाचा क्रम सुरूच राहिला.

शेवटी भरद्वाजानं अमृत–तत्त्व आत्मसात केलं. त्याची तृप्ती झाली. मिळालेलं ज्ञान पुरेसं वाटत होतं. इंद्र प्रकट झाला.

''वत्सा, वर माग. मी प्रसन्न आहे.''

''भगवत्, आता मला आपण एकच वर द्यावा.''

''बोल.''

''मी मिळवलेल्या ज्ञानाचा उपयोग जनकल्याणासाठी व्हावा हाच वर आपण मला द्यावा. मला मिळालेलं ज्ञान वाढत जावं, ते अनेकांनी ग्रहण करावं, पुन्हा ते इतरांपर्यंत पोहोचवावं. असा हा ज्ञानवृक्ष सदा बहरलेला रहावा. त्याच्या छायेत कुणीही विसावावं, त्याची फळं कुणीही चाखावीत हीच माझी इच्छा !''

''तथास्तु ! तथास्तु ! तथास्तु !''

भरद्वाज गुरुचरणी लीन झाला. त्यानं वर मान करून पाहिलं; तर काय, एकाऐवजी दोन भृगुमुनी! तो अचंबित झाला.

आता इंद्रदेवानं स्वरूप घेतलं. भरद्वाजाचा भ्रमनिरास झाला. इंद्र आणि भृगु दोघेही त्याचे गुरू होते.

भृगु म्हणाले, ''भरद्वाज, तू धन्य आहेस ! तुझी ज्ञानलालसा तीव्र आहे. मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग तुला स्वार्थासाठी नकोय. स्वहित हा भोग आहे. परहित हा योग आहे.तू खरा योगी आहेस, मी तुला आशीर्वाद देतो. तुझ्या इच्छेप्रमाणे ज्ञानवृक्षाच्या छायेत अनेक पांथस्थ विसावतील. जगाच्या अंतापर्यंत ज्ञान वृध्दिंगतच होत राहील.''

अशी ही गुरू–शिष्याची अद्वितीय जोडी !

✦✦

# महर्षी दध्यङ् आणि अश्विनीकुमार

महर्षी दध्यङ् यांचा आश्रम भूतलावरचा एक सुंदर आश्रम होता. हिमालयाच्या कुशीत विसावलेला, वनश्रीनं नटलेला असा हा आश्रम ! उंच उंच गगनस्पर्शी वृक्ष आश्रमाच्या भोवती होते. जणू आश्रमाचे रक्षणकर्तेच ! बाजूनं वाहणारे निसर्गरम्य झरे ! आश्रमाला जाग येई ती पाखरांच्या किलबिलीने, दूरदूच्या देशीचे अनेक शिष्य महर्षी दध्यङ् यांचेकडे विद्याग्रहणासाठी येत. महर्षी स्वत: फार विद्वान होते, ज्ञानी होते. ज्ञानदानाची त्यांना अत्यंत आवड होती.

अशा या महर्षींची ख्याती स्वर्गलोकात इंद्राच्या कानी पडली. एकदा इंद्र आणि त्याची पत्नी इंद्रायणी नंदनवनात हिंडत असता इंद्रायणी म्हणाली, ''महाराज, आपण कोणत्या गोष्टीत एवढे मग्न आहात ? गेले कित्येक दिवस मी बघतेय. दैत्यांनी पुन्हा काही उत्पात तर माजवलेला नाही ना ? त्यांचा स्वर्गावर स्वारी करण्याचा इरादा तर नाही ना ?''

''नाही इंद्रायणी.''

''मग ?''

''पृथ्वीवर दध्यङ् नावाचे एक महर्षी आहेत. हल्ली त्यांच्या नावाचा बराच बोलबाला झालाय. फार ज्ञानी आहे म्हणतात.''

''त्यांच्याकडे काही शिकायला जावं असं आपल्या मनी आहे का ?''

''हो.''

''मग जावं लगेच. त्यात समस्या ती कसली ?''

''आहे, एक समस्या खासच आहे.''

''ती कसली ?''

''मी स्वर्गाचा राजा, ते पृथ्वीवरचे महर्षी. मला ते आपला शिष्य म्हणून स्वीकारतील का ?''

''का  नाही स्वीकारणार ? गुरूजवळ असा भेदभाव थोडाच असतो ! गुरूला सारेच शिष्य सारखे.''

''तरीसुद्धा...''


''आपण एकदा जाऊन बघावं महाराज त्यांच्याकडे; पण एक सांगावं, अशी कोणती खास विद्या त्यांच्याजवळ आहे जी शिकण्याची आपल्याला तीव्र इच्छा आहे ?''

''एक गूढ विद्या त्यांच्याजवळ आहे.''

''गूढ विद्या ?''

''हो. त्या विद्येचं नाव आहे मधुविद्या. सर्व रोग-व्याधींवर अत्यंत उपायकारक अशी ही विद्या आहे. ही विद्या ग्रहण केल्यानं प्राणी इतरांना व्याधीमुक्त करू शकतो.''

''पण आपल्याला ही विद्या शिकण्याचं कारणच काय ? आपल्या या स्वर्गामध्ये कमतरता कोणत्या गोष्टीची आहे ? सतत पूर्ण चंद्राचा प्रकाश मिळत असतो. मंदाकिनीचं मधुर पाणी ! मंदाकिनी कधी आटतच नाही. फुलांचा मंद मधुर वास ! फुलांना कोमेजणं नाही. सदा टवटवीत ! वाऱ्याची शीतलता ! सारी सुखं इथं अनुभवायला मिळावीत  म्हणून भूलोकीचे प्राणी धडपडत असतात स्वर्गलोकी यायला.''



''एक गोष्ट तुझ्या लक्षात आलेली दिसत नाही इंद्रायणी.''

''कोणती ?''

''देव-दानवांच्या युद्धात काही वेळेस देवांची सरशी होते, काही वेळेस दानवांची. युद्धप्रसंगी देवांवर संकट आलं; तर त्यातून मुक्त होण्यासाठी मधुविद्येसारखी विद्या जवळ असायला पाहिजे.''

''आपण एकदा जाऊन तर बघावं महर्षींकडे.''

इंद्रायणीनं प्रोत्साहन दिलं, आणि इंद्राच्या मनात तर होतंच, म्हणून तो महर्षी दध्यङ् यांचेकडे जाण्यास निघाला.

स्वर्गलोकातून इंद्र पृथ्वीवर येऊन पोहोचला. तो महर्षींच्या आश्रमात आला. महर्षी आपल्या शिष्यांना परमेश्वराचं स्वरूप समजावून सांगत होते. गुरू आणि शिष्य अध्ययनं-अध्यापनात